73व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

Q.1 लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी आणि देशाच्या ग्रामीण विकासासाठी बलवंतराय मेहता समितीने त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची शिफारस केली. या शिफारशीच्या आधारेच देशात पहिल्यांदा राजस्थान येथे पंचायतराज व्यवस्था सुरु करण्यात आली. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीसाठी वसंतराव नाईक समितीची स्थापना करण्यात आली. 15 मार्च 1961 ला वसंतराव नाईक समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला. त्यानुसार 5 मार्च 1962 रोजी भारताच्या राष्ट्रपतीकडून याला मान्यता देण्यात आली. 1 मे 1962 रोजी महाराष्ट्रात पंचायत राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार कारभार चालतो. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्था त्रिस्तरीय स्वरुपाची आहे. या पंचायत राज व्यवस्थेतील लोकप्रतिनिधींची निवड प्रत्यक्ष निवडणूकीतून होते. अलिकडे महाराष्ट्रात सरपंचाची निवड थेट जनतेतून होत आहे. पंचायत राजसंस्थेचा इतिहास समजून घेताना 1957 च्या बलवंतराय मेहता समिती 1960 च्या वसंतराव नाईक समिती यांच्यासह 1960 ची व्ही. टी कृष्णमाचारी समिती, 1965 ची संतनाम समिती, 1966 ची जैन समिती, 1977 ची अशोक मेहता समिती, 1985 ची जी. व्ही. के. राव समिती यासह बोंगिरवार आणि पी. बी. पाटील समिती या सर्व समित्या महत्वाच्या आहेत.

यासर्व समित्यांनी पंचायतराज संस्थेविषयी अभ्यास करून अनेक शिफारशी सुचविल्या पंचायत राज संस्थेशी संबंधित भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वात तरतूद करण्यात आली. मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करण्याचे घटनात्म

रु केवळ शासनावलंबित नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना राजकीय आर्थिक स्वायत्तता व अधिकार या बाबतच्या मर्यादा होत्या. या मर्यादा नष्ट व्हाव्यात व पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळावा म्हणून 1993 साली 73 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्य घटनेतील चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्वातील 40 व्या कलमाला व्यवहारात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. 73 व्या घटना दुरुस्ती खालील तरतूद करण्यात आली. या तरतूदींचा उल्लेख 73 व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये म्हणून केला जातो.

1) विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण :-

या घटना दुरुस्तीनूसार संविधानाच्या 243 व्या कलमात पंचायतराज व्यवस्थेची तरतूद करण्यात आली. या घटना दुरुस्तीने पंचायतराज संस्थेशी संबंधित विविध संकल्पनांचा अर्थ स्पष्ट केला कारण या संकल्पनाविषयी गोंधळ निर्माण होऊ नये.

2) त्रिस्तरीय रचना :-

या घटना दुरुस्तीनूसार स्थानिक स्वराज्य संस्थे त्रिस्तरीय रचना स्विकारण्यात आली ग्रामपंचायत गाव, पंचायत समिती - तालूका व जिल्हा परिषद - जिल्हा अ एकूण तीन स्तर पंचायत समितीचे असतील असे 73 वी घटना दुरुस्ती सांगते.

3) ग्रामसभा :-

कलम 243 (अ) नूसार ग्रामसभेच्या स्थापना व अधिकाराची तरतूद केली आहे. या तरतूदी नूसार प्रत्येक गावात

ग्रामसभेचे आयोजन करावे. मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येकाचा या ग्रामसभेत सहभाग असावा.

4) आरक्षणाची तरतूद :-

कलम 243(D) नुसार पंचायतराज व्यवस्थेत आरक्षणची तरतूद करण्यात आली. यानूसार अनुसुचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST) यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. इतर मागास प्रवर्गातील लोकांस 27% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. आणि महिलांसाठी एकूण सदस्य संख्येच्या $\frac{1}{3}$ म्हणजेच 33% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. अलिकडे यात दुरुस्ती करून महिलासाठी 50% आरक्षणाची तरतूद स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 73 व्या घटना दुरुस्तीनूसार जाहिर केलेल्या आरक्षणाचा फायदा सर्वच प्रवर्गाला मिळावा. यासाठी आरक्षण वारंवार बदलत असते.

5) कार्यकाळ :-

या घटना दुरुस्तीने कलम 243(E) नूसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचा कार्यकाळ 5 वर्षाचा राहील असे जाहीर केले.

6) अधिकार व कार्ये :-

73 व्या घटना दुरुस्तीनूसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकार व कार्य जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या कलम 243(G) नूसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये निश्चित करण्यात आले.

7) लेखा परिक्षण :-

73 व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे कार्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी निश्चित स्वरुपाच्या निधीची तरतुद केली आहे. शासनाने दिलेला हा निधी त्याचा हिशोब व्यवस्थीतपणे स्थानिक स्वराज्य संस्थांना ठेवावा लागतो. या हिशोबाची व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी करण्याचा अधिकार व तरतुद या घटना दुरुस्तीने केली आहे.

8) निवडणूका :-

73 व्या घटना दुरुस्तीने प्रत्येक घटकराज्यातील पंचायत राज संस्थाच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य निर्वाचन आयोग स्थापना करण्याची तरतुद केली आहे. या आयोगामार्फतच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होतात.

9) वित्त आयोगाची स्थापना :-

73 व्या घटना दुरुस्तीनुसार घटकराज्याच्या राज्यपाल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक समिक्षणासाठी दर पाच वर्षाला एका वित्त आयोगामार्फतच स्थानिक स्वराज्य संस्था विकास निधी शासनाला कळवला जातो. या निधीचे समिक्षण याच आयोगामार्फत केले जाते.

* जिल्हा परिषद :-

जिल्हा परिषद पंचायतराज व्यवस्थेतील शिखर संस्था म्हणून ओळखली जाते. ग्रामीण भागाच्या विकासाचा प्रमती मार्ग म्हणजे जिल्हा परिषद. जिल्हा परिषद राजकीय नेतृत्वाच्या उदयाची प्राथमिक धडे देणारी संस्था आहे. जिल्हा परिषद देशाचे भविष्यातील नेतृत्व घडविणारी कार्यशाळा आहे. जिल्हा परिषद छोटी संसद म्हणून संबोधली जाते. ग्रामीण भागाच्या विकासाबाबतचे शासनाने ठरलेले सर्व नियोजन, धोरण व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी जिल्हा परिषदेवर असते.

- रचना :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम दुसऱ्या प्रकरणानुसार जिल्हा परिषदेची स्थापना केली जाते. महाराष्ट्रात 1 मे 1962 पासून जिल्हा परिषदेची स्थापना केली जाते 73 व्या घटना दुरुस्तीनुसार आणि वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेची स्थापना केली जाते. जिल्हा परिषदेची रचना खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येते.

- पात्रता :-

जिल्हा परिषदेच्या सदस्य होण्यासाठी खालील पात्रता लागतात.

1) तो भारताचा नागरिक असावा.
2) वयाची 21 वर्षे वय पूर्ण केलेली असावी.
3) जिल्ह्यातील कोणत्याही जिल्हा परिषद मतदार संघात मतदार म्हणून त्याचे नाव असावे.
4) शासकीय लाभाच्या कोणत्याही पदावर नसावा.

असू नये.
5) वेडा व दिवाळखोर
6) महाराष्ट्र शासन व निवडणूक आयोगाने ठरविलेल्या अटींची पूर्तता करणारा असावा.

- **बडतर्फी :-**
जिल्हा परिषदेवर निवडून आलेल्या सदस्याचे सद[illegible] त खालील कारणास्तव रद्द होऊ शकते.
1) त्याने स्वतः आपल्या पदाचा जिल्हा परिषद अध्यक्षा[illegible] राजीनामा दिला असल्यास.
2) त्याचा मृत्यू झाला असल्यास.
3) जिल्हा परिषदेच्या $\frac{2}{3}$ सभासदांनी बहुमताने एखाद्या सदस्याच्या गैर वर्तनाची राज्यशासनाकडे तक्रार केल्यास त्याला बडतर्फ केले जाते.
4) एखादा सदस्य परवानगी न घेता परिषदेच्या सभांना गैरहजर राहत असल्यास आयुक्ताला त्या व्यक्तिला पदा[illegible] रून काढून टाकण्याचा अधिकार आहे.

- **निवडणूक :-**
जिल्हा परिषद बरखास्त झाल्यानंतर 6 महिन्याच्या आत जिल्हा परिषदेची फेर निवडणूक घ्यावी लागते.

- **जिल्हा परिषदेचे आरक्षण :-**
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा परिषदेत त्या त्या प्रवर्गातील लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा आरक्षि[illegible] ठेवल्या जातात. सदरील आरक्षण मतदार संघ निहाय बदलत जाते. सध्या 50% राखीव जागा महिलांसाठी आरक्षित असतात. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षण असते.

- अध्यक्ष व उपाध्यक्ष :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधि- नियमानुसार (1961) जिल्हा परिषदेत प्रत्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांपैकी एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष जिल्हा परिषदे- च्या पहिल्याच सभेत निवडले जातात.

- समित्या :-

जिल्हा परिषदेला ग्रामीण भागाच्या विकास करता यावा म्हणून खालील समित्या गठीत केल्या जातात.

1) स्थायी समिती
2) अर्थविषयक समिती
3) कृषी समिती
4) बांधकाम समिती
5) समाजकल्याण समिती
6) शिक्षण समिती
7) आरोग्य समिती
8) महिला व बालकल्याण समिती
9) पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती
10) जलसंधारण व पाणीपुरवठा समिती

वरील समित्यांपैकी स्थायी समिती जिल्हा परिषदे- चे कॅबिनेट समजले जाते. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष हा स्वी स्थायी समितीचा अध्यक्ष असतो. यासर्व समित्यात जिल्हा परिषदेचे सभासद हेच सदस्य असतात.

- जिल्हापरिषदेचे उत्पन्न :-

जिल्हा परिषदेला विकास कामासाठी आर्थिक निधींची आवश्यकता असते या आर्थिक निधीची तरतूद कराची वसूली व राज्यशासनाच्या अनुदानातून होते परंतु

जिल्हा परिषदेला हे सर्व अनुदान नियमानुसारच खर्च करणे लागते व त्याचा हिशोब ही ठेवावी लागतो.

- जिल्हा परिषदेचे कार्य :- संपूर्ण जिल्हा हे जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र असते त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मध्ये जिल्हा परिषदेचे खालील कार्ये सांगितली आहे

1) कृषी विषयक शासनाच्या योजना ग्रामीण भागापर्यंत पोहचवणे.
2) पिक संरक्षण, पिकांची पाहणी, सुधारीत बियाणे यांची माहिती शेतकऱ्यांना देणे.
3) ग्रामीण भागात पशुसंवर्धनाची माहिती जनतेला
4) पशुच्या आरोग्यासाठी पशुचिकित्सालय काढणे.
5) शेतीस पूरक असणाऱ्या विविध जोडधंद्यांची माहिती उदा :- वराह पालन, मत्स्य पालन, शेळी पालन, कुक्कुट, रेशीम किड्यांचा व्यवसाय, गांडूळ खत, मशरूम इ. व्यवसायांचे प्रशिक्षण व प्रोत्साहन दिले जाते.
6) ग्रामीण भागातील गायरान पडित जमीन इत्यादींची वृक्ष लागवड करणे.
7) आपल्या कार्यक्षेत्रा अंतर्गत असलेल्या जंगलाचे संरक्षण करणे.
8) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे उदा, वसतीगृह बांधणे.
9) आंतरजातीय विवाहासाठी प्रयत्न करणे किंवा प्रोत्साहन देणे.
10) मागासवर्गीय जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे.
11) प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षण मोफत

12) ग्रामीण भागात शाळा स्थापन करणे.
13) या शाळांना शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देणे.
14) दळण वळण सोयीचे व्हावे. म्हणून पक्क्या रस्त्यांची बांधणी करणे. आवश्यक तेथे पुलांची उभारणी करणे.
15) शेतीसाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून पाटबंधारे व सिंचनाच्या इतर सुविधा राबवणे.

वरील कार्याशिवाय जिल्हापरिषदेला साप्ताहिक बाजाराची व्यवस्था, विश्रांतीगृहे, तिर्थक्षेत्रांची व्यवस्था, अर्थ पुरविण्यासाठी बँकांची स्थापना आणि पंचायत समिती व ग्रामपंचायतीत समन्वय स्थापन करणे. वरील सर्व कार्य करण्यासाठीचे महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद अधिनियम 1961, 73वी घटना दुरुस्ती यासह शासनाच्या अनेक निर्णयांनी पुरक अधिकार जिल्हा परिषदेला दिले आहेत.

* पंचायत समिती :- पंचायत राज व्यवस्थेतील पंचायत समिती हा जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीला जोडणारा महत्वाचा दुवा आहे. पंचायत समिती जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीत समन्वय साधणारी महत्वाची संस्था आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 56 नुसार प्रत्येक तालुक्यासाठी एका पंचायत समितीची निर्मिती केली आहे. महाराष्ट्रातील पंचायत समितीची रचना व कार्यांची तरतूद 1961 च्या अधिनि[यमात] केली आहे. या अधिनियमानुसार पंचायत समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.

1) निवड :-

पंचायत समितीच्या सर्व सभासदांची निवड गुप्त प्रौढ मतदान पद्धतीने केली जाते.

2) पात्रता :-

पंचायत समितीचा सभासद म्हणून निवडून ये[ण्या]साठी खालील पात्रता पूर्ण करावी लागते.

1) तो भारताचा नागरिक असावा.
2) वयाची 21 वर्षे पूर्ण केलेली असावी.
3) पंचायत समितीच्या कोणत्याही मतदार संघात मतदार म्हणून त्याचे नाव असावे.
4) संबंधित व्यक्ति कोणत्याही लाभाच्या पदावर नसावी.
5) तो थकबाकीदार नसावा.
6) तो वेडा किंवा पागल नसावा.
7) शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटींची पूर्तता करणारा असावा.

3) कार्यकाळ :-
पंचायत समितीचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो परंतु राज्यसरकार गैरकारभारामुळे पंचायत समितीला बरखास्त करु शकतो. अशा बरखास्त झालेल्या पंचायत समितीत 6 महिन्यांच्या आत पुन्हा निवडणूका घ्याव्या लागतात.

4) आरक्षण :-
सभापती 73 व्या घटना दुरुस्तीनूसार आणि महाराष्ट्र शासनाने त्यात केलेल्या सुधारणेनूसार अनुसूचित जाती, जमाती इतर मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी आरक्षण ठेवले जाते.

5) सभापती व उपसभापती :-
महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नूसार प्रत्येक पंचायत समितीत एका सदस्याची सभापती म्हणून निवड केली जाते. तर त्याला मदत करण्यासाठी एकाची उपसभापती म्हणून निवड केली जाते.
वरील प्रमाणे पंचायत समितीची रचना करण्यात आली.

* पंचायत समितीचे कार्य :-
महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नूसार पंचायत समितीचे कार्य निश्चित करण्यात आले या कार्याबाबत 73 वी घटना दुरुस्ती व महाराष्ट्र शासनाच्या अनेक कायद्याने स्पष्टीकरण दिले आहे. पंचायत समिती शासकीय योजनांना

तालुका स्तरापर्यंत पोहचवणारी महत्वाची संस्था आहे.
महाराष्ट्र शासन या संस्थेच्या मदतीने तालुका स्तरावरील
लोकांचे प्रश्न सोडविते. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी
पंचायत समिती खालील कार्य करते
1) आपल्या कार्यक्षेत्रातील भागाच्या (ग्रामीण) विकासाचा
आराखडा तयार करणे.
2) शासनाकडून विकास योजनासाठी अनुदान मिळवणे.
3) ग्रामीण भागातील विकास योजनांना अनुदान उपलब्ध
करून देणे
4) जिल्हा परिषदेच्या विकास योजना आपल्या कार्यक्षेत्रात
राबविणे.
5) कृषी व पशुसंवर्धनांचे कार्य करणे.
6) कृषी व समाज कल्याणाशी संबंधित कार्य करणे.
7) आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांच्या आरोग्याची काळजी
घेऊन त्यांना आरोग्य विषयक सुविधा पुरविणे
8) आपल्या कार्यक्षेत्रातील पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था
करणे.
9) दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करणे.

या शिवाय पंचायत समितीला सामुहिक
विकास गृहनिर्माण यासारखे समाज उपयोगी व वि...
भिमूख कार्य करावे लागते. पंचायत समिती या ...
कार्याचे पालन प्रभावीपणे करते. या सर्व कार्याची
व्यवस्थित अंमलबजावणी व्हावी म्हणून पंचायत स...
खालील समित्या नियुक्त करते.

उदा, रोजगार हमी योजना समिती,
रोजगार समिती सरपंचाची समिती, समन्वय स...
ग्रामीण विकास लाभार्थी समिती, क्रिडा समिती.
...य वितरण समिती, पंचायत समिती पंचायत स...

व्यवस्थेतील मध्यवर्ती संस्था आहे म्हणून स्थानिक स्वरा-
ज्य संस्थेत या संस्थेचे महत्व दिसून येते.

* ग्रामपंचायत :-

घटक राज्यांना ग्रामपंचायतीची स्थापना करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेतील कलम ४० नुसार देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतूदीचा आधार घेऊन स्वातंत्र्यानंतर अनेक राज्यांनी ग्रामपंचायतीची स्थापना केली. स्वातंत्र्या अगोदर ग्रामपंचायतीची स्थापना रचना व कार्याबाबत 1920 ला ग्रामपंचायत कायदा बनविण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर ग्रामपंचायतीसाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 तयार करण्यात आला. याच कायद्यानुसार महाराष्ट्रात ग्रामपंचायतीची स्थापना करुन त्यात सुधारणा करण्यात आल्या.

* ग्रामपंचायतीची रचना :-

1) पात्रता :-

ग्रामपंचायतीचा सदस्य होण्यासाठी खालील पात्रता पूर्ण करावी लागते.

1) भारताचा नागरिक असावा.
2) वयाचे 21 वर्ष पूर्ण केलेली असावी.
3) गावच्या मतदार यादीत मतदार म्हणून नाव असावे
4) संबंधित व्यक्ती शासकीय लाभाच्या पदावर नसावी.
5) ज्या व्यक्तिवर न्यायालय प्रक्रियेतून गुन्हा सिद्ध झाला. अशा व्यक्तिला निवडणूक लढवता येत नाही

२) राखीव जागा :- गावाच्या लोकसंख्येनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी काही जागा राखीव असतात. महिलांसाठी 50% जागांचे आरक्षण असते. इतर मागास प्रवर्गासाठी 27% आरक्षित जागा असतात.

३) निवडणूक प्रक्रिया :- ग्रामपंचायतीचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूका पार पाडण्यात पाडतात. या निवडणूकीत गुप्त व प्रौढ मतदान पद्धतीचा वापर केला जातो.

४) सरपंच :- महाराष्ट्र शासनाने 2017 मध्ये केलेल्या बदलानुसार ग्रामपंचायतीत सरपंचाची निवड प्रत्यक्ष जनतेतून होत आहे. सरपंचाच्या निवडीसाठी महिला इतर मागास प्रवर्ग अनुसूचित जाती व जमातींचे आरक्षण असते

५) कार्यकाळ :- ग्रामपंचायतीचा कार्यकाळ ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेपासून पाच वर्षाचा असतो.

६) बडतर्फी :- महाराष्ट्रातील कोणत्याही ग्रामपंचायतीचे मुदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार राज्यशासनाला आहे. सदस्यांचे गैरवर्तन, कामातील दिरंगाई, कामातील निष्काळजीपणा ~~भ्रष्ट~~ भ्रष्टाचार अशा अनेक कारणावरुन ग्रामपंचायतीच्या सभासदांना निष्काशीत करता येते.

* **ग्रामपंचायतीचे कार्य :-**

प्रत्येक ग्रामपंचायत ग्रामीण भागाच्या विकासाला केंद्रबिंदू मानून काम करत असते. मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या पहिला अनुसूचित ग्रामपंचायतीने करावयाच्या कार्याची यादी दिली आहे. या यादीतील सर्व विषयावर कार्य करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला असतो. ग्रामपंचायतीचे कार्य खालील भागात विभागलेले आहे.

1) कृषी विषयक कार्य
2) पशुसंवर्धनाचे कार्य
3) वनविषयक कार्य
4) सामाजिक कल्याणाचे कार्य
5) शैक्षणिक कार्य
6) आरोग्यविषयक कार्य
7) बांधकाम विषयक कार्य
8) जलव्यवस्थापनाचे कार्य
9) सहकार विषयक कार्य
10) प्रशासकीय कार्य व संरक्षक विषयक कार्य

वरील विभागामार्फत प्रत्येक ग्रामपंचायत गावाच्या विकासासाठी कार्य करते. ग्रामपंचायतीचे वरील विभागाचे कार्य सविस्तरपणे खालीलप्रमाणे सांगता येते.

1) ~~सेती~~ शेतीविषयक योजनांची माहिती देणे.
2) गायरान व पडीत जमीन शासनाच्या परवानगीने लागवडीखाली आणणे.
3) जनावरांचे आरोग्य सुधारणे.
4) ग्रामीण भागातील जंगल वाढवणे व त्याचे संवर्धन करणे
5) अपंग, निराधार व कमकुवत व्यक्तिंना सहकार्य करणे

6) दारुबंदी अस्पृश्यता निवारण, एड्स जनजागृती अभियान राबवून लोकांना जागरुक करणे.

7) गावातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेणे.

8) सार्वजनिक शौचालयाची निर्मिती करणे.

9) स्मशान भूमीची व्यवस्था करणे.

10) सार्वजनिक इमारतीची निगा ठेवणे

11) अवैध बांधकाम रोखणे.

12) बांधकामाच्या परवाना देणे.

13) सार्वजनिक जागेचा वापर समाज व राष्ट्र उपयोगी कार्यासाठी करणे.

14) गावात सांडपाण्याची व्यवस्था करणे.

15) गावात विजेची व्यवस्था करणे.

16) सहकारी शेतीची संकल्पना राबविणे.

17) ग्रामपंचायतीचा अभिलेख तयार करणे.

18) गावातील प्रत्येक घराला घर क्रमांक देणे.

19) गावातील जमीनींचे मोजमाप करुन त्याची नोंद

20) गावातील प्रत्येक मालमत्तेचा कर निश्चित करणे.

21) गावातील प्रत्येक मालमत्ता धारकाकडून कर वसूल

22) गाव पातळीवर सार्वजनिक उत्सवांचे आयोजन करा

अशा प्रकारे ग्रामपंचायतीला वरील स करावे लागतात ग्रामपंचायत सदस्य, सरपंच व ग्राम यांच्या समन्वयातून ग्रामपंचायत वरील कामे करु वरील सर्व विकास कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीला घी, शासकीय अनुदाने व कर आकारुन मिळणाऱ्या ची मदत घ्यावी लागते.

## 2. स्थानिक स्वराज्य संस्था (शहरी)

प्र. नगरपालिकेची रचना सांगून कार्य लिहा.

→ भारताचा स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास अतिप्राचीन आहे. महाभारत, रामायण, मनुस्मृती, वेद या अनेक ग्रंथात स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास दिसून येतो. आधुनिक भारतात ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्थेची रुजवणूक केली. लॉर्ड रिपन हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक आहेत. 1687 साली मद्रास शहरासाठी पहिली महापालिका स्थापन करण्यात आली. यानंतर 1793 साली कलकत्ता व मुंबई शहरासाठी महापालिकेची स्थापना करण्यात आली. 1870 साली लॉर्ड मेओ या अधिकाऱ्याने वित्त आर्थिक विकेंद्रिकरणासाठी काही प्रमुख उपाय योजना मांडल्या. या उपाययोजनांचा एक भाग म्हणून या संस्थाकडे पाहिले जाते. लोकांचा राजकीय सहभाग लोकांचे प्रतिनिधीत्व मतदानाच्या अधिकारांचा विस्तार स्थानिक संस्थांना आर्थिक अधिकार मिळावेत म्हणून या संस्थांचा उदय व विकास करण्यात आला. मुंबई शहर अधिनियम 1956 मल महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजक अधिनियम 1960, 1956 चा राज्यपुनरच ना आयोग आणि 74 व्या घटना दुरुस्तीने शहरी स्थानि क स्वराज्य संस्थामध्ये महत्त्वपूर्ण बदल केले. 74 व्या घटना दुरुस्तीने शहरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मह त्त्वपूर्ण बदल केले. 74 व्या घटना दुरुस्तीने नगरपालिका आणि महानगरपालिका संदर्भात महत्त्वपूर्ण बदल घड आणले.

आधुनिकीकरण व तंत्रज्ञानाच्या वाढत्या वेगामुळे शहरांच्या विकास तीव्र गतीने झाला. या वाढत्या शहरां व्यवस्थेसाठी नगरपालिका व महानगरपालिका या संस्थां निर्मिती झाली.

1901 साली ब्रिटिशांनी पहिली नगरपालिका मुंबई येथे स्थापन केली. तेव्हापासून आजपर्यंत शहरी भागांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात नगरपालिका व महानगरपालिका कार्य करते.

+ रचना :-

1) सभासद संख्या :-

महाराष्ट्रात नगरपालिकांची विभागणी अ, ब, क अशा तीन वर्गात केली जाते. ज्या नगरपालिकेची सभासद संख्या 38-65 असते ती नगरपालिका 'अ' दर्जाची असते. 23-38 सभासद संख्या असणारी नगरपालिका 'ब' दर्जाची असते. 17-23 सभासद संख्या असणारी नगरपालिका 'क' दर्जाची असते.

2) सभासदाची निवड :-

वरील तिनही दर्जाच्या नगरपालिकेतील लोकप्रतिनिधींची निवड प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते. प्रत्येक प्रभागातून 3 किंवा 4 लोकप्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून निवडले जातात. या लोकप्रतिनिधींना नगरसेवक म्हणतात. नगरपालिकेतील काही प्रभाग लोकसंख्येनुसार अनुसुचित जाती, जमाती इतर मागास प्रवर्ग (OBC) आणि महिलासाठी राखीव असतात. अलीकडे 50% आरक्षण महिलांना असल्यामुळे 50% जागा महिलांसाठी राखीव असतात.

3) पात्रता :-

महाराष्ट्रातील कोणत्याही नगरपालिकेचा सभासद होण्यासाठी खालील पात्रता पूर्ण कराव्या लागतात.

1) भारताचा नागरिक असावा.
2) वयाची 21 वर्ष पूर्ण झालेले असावेत.
3) नगरपालिकेत कोणत्याही प्रभागात मतदार म्हणून त्याचे नाव असावे.
4) तो नगरपालिकेचा कोणत्याही कराच्या (Tax) थकबाकीदार नसावा.
5) तो कोणत्याही शासकीय लाभाच्या पदावर नसावा.
6) तो वेडा किंवा दिवाळखोर नसावा.
7) त्या प्रभागातील आरक्षणाच्या अटीची पूर्तता करणारा असावा.
8) ज्या व्यक्तिला दोनवर्षापेक्षा अधिक काळासाठी तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे. अशा व्यक्तीने पुढच्या 5 वर्षापर्यंत निवडणूक लढवता येत नाही.

4) कार्यकाळ :-
नगरपालिकेचा कार्यकाळ 5 वर्षाचा असतो. नगरसेवकांचीही कार्यकाळ 5 वर्षाचा असतो.

5) बडतर्फी :-
एखादा नगरसेवक स्वखुशीने आपला राजीनामा जिल्हा परिषद तसेच सभासदाचे गैरवर्तन, बेजबाबदार वागणे या बाबत नगरपालिकेने राज्यशासनाकडे शिफारस केल्यास राज्यशासन त्यांचे सदस्यत्व रद्द करु शकते.

6) नगराध्यक्ष :-
प्रत्येक नगरपालिकेचा एक नगराध्यक्ष असतो नगराध्यक्षाची निवड दोन पद्धतीने होते. एक निवडून आलेल्या नगरसेवकामधून दोन प्रत्यक्ष जनतेकडून

सध्या महाराष्ट्रात नगरपालिकेच्या नगरअध्यक्षाची निवड प्रत्यक्ष जनतेमधून होते.

7) **समित्या** :-

महाराष्ट्रातील 'अ,ब' वर्गाच्या नगरपालिकेसाठी एक स्थायी समिती, आरोग्य समिती, शिक्षण समिती, पाणीपुरवठा समिती, परिवहन समिती, महिला व बाल कल्याण समिती, शहर व विकास समिती या सर्व समित्यामध्ये स्थायी समिती महत्वाची असते. नगराध्यक्ष स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

8) **नगरपरिषदेचे उत्पन्न** :-

कोणत्याही नगरपालिकेला शहराच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी पैशाची गरज असते. नगरपालिकेची ही आर्थिक गरज खालील तीन मार्गातून पूर्ण होते.

1) कर आकारणी (मालमत्ता कर, शिक्षण कर, करमणूक कर, वाहन कर, जाहीरात कर, वृक्ष संवर्धन कर, व्यापार कर)
2) अनुदान
3) कर्ज

* **नगरपालिकेचे कार्य** :-

महाराष्ट्रातील कोणत्याही नगर पालिकेला खालील काही कार्य करावी लागतात. नगरपालिकेच्या या कार्याची विभागणी दोन भागात केली जाते.

1) आवश्यक कार्य / अनिवार्य कार्य
2) ऐच्छिक कार्य

1) अनिवार्य कार्य :-

नगरपरिषदेला शहराच्या विकासासाठी व नागरिकांच्या सोयीसाठी काही महत्त्वाचे कार्य करावे लागतात. नगरपालिकेच्या या अनिवार्य कार्याचे प्रचित नगर या शब्दाच्या विग्रहातून येते. म्हणजेच न = नळ, ग = गटार, र = रस्ते याशिवाय नगरपालि... च्या खालील अनिवार्य कार्य करावे लागते.

1) रस्त्यांची स्वच्छता व दिवाबत्तीची सोय करणे.
2) अग्निशमन दलाची व्यवस्था ठेवणे.
3) बांधकाम परवाने देणे.
4) अनिधीकृत बांधकाम रोखणे.
5) स्मशान भूमीची व्यवस्था करणे.
6) जन्म मृत्यूची नोंद ठेवणे.
7) मालमत्तांना क्रमांक देणे.
8) रोग प्रतिबंधक लसीकरण करणे.
9) प्राथमिक शिक्षणासाठी शाळा उघडणे.
10) कर लावणे व वसूल करणे.
11) राज्यशासनाच्या सुचनांचे पालन करणे.
12) शहरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे.
13) जिल्हा अधिकाऱ्याच्या आदेशाने शहराची सिमा सिमा निश्चित करणे.

इत्यादी आवश्यक कार्य कोणत्याही नगरपालि... ला करावी लागतात.

2) ऐच्छिक कार्य :-

ऐच्छिक कार्य नगरपालिकेवर बंधनकारक नसतात. परंतू शहराच्या सौंदर्यासाठी ऐच्छीक कार्य करते. ज्या नगरपालिकेकडे पैशाची अधिक उपलब्धता

आहे. इच्छाशक्ती आहे. त्या नगरपालिका ऐच्छीक कार्य करतात. ऐच्छीक कार्य म्हणजे इच्छेवर अवलंबून असणारे कार्य. यातील कार्याचा समावेश नगरपालिकेच्या ऐच्छीक कार्यामध्ये होतो.

1) आवश्यक रस्त्यांची निर्मिती करणे.
2) गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करणे.
3) शहरात उदयाने व मनोरंजनाच्या साधनाची निर्मि[ती] करणे.
4) सांस्कृतिक सभागृहाची उभारणी करणे.
5) शहरातील मोकाट जनावरांसाठी कोंडवाडे बांधणे.
6) शहरातील बस वाहतूक सेवा निर्माण करणे.
[7]) नागरिकांना चांगल्या कामासाठी प्रोत्साहन पर बक्ष[ीस] देणे.
[8]) नगरपालिकेच्या क्षेत्रात यात्रा प्रदर्शने व समारंभ आयोजन करणे.
[9]) शहरातील मांस विक्रेत्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करणे

याशिवाय महाराष्ट्रातील नगरपरिषदांना [श]ैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक, नैसर्गिक कार्य करा[वे ल]ागतात. नगरपालिका आपले सर्व कार्य मुख्याधिकारी [न]गराध्यक्ष, नगरसेवक नगरपालिकेचे कर्मचारी व जन[ता] या सर्वांच्या सहकार्याने करते.

* महानगर।

## * महानगरपालिका :-

2011 च्या जनगणनेनुसार भारतात फक्त 11 करोड शेतकरी आहेत याचा अर्थ दिवसे दिवस शेतीव शेतकरी हे प्रमाण कमी होऊन शहरीकरणाचा वेग वाढत आहे. या शहरांचे महानगरामध्ये रूपांतर झाले या महानगरात राहणाऱ्या लोकांच्या मुलभूत गरजा पुरवणे व त्यांचे जीवन अधिक सुखकारक व्हावे म्हणून भौतिक आणि सुविधा निर्माण करण्याचे काम शासन व प्रशासनाला करावे लागते. या कार्यात मदत व सोयीस्करपणा यावा म्हणून 74 व्या घटना दुरुस्तीनुसार महानगरपालिकांची निर्मिती करण्यात आली.

महानगरपालिका शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्वोच्च संस्था आहे. ब्रिटिश काळापासूनच अशा महानगरपालिकांची निर्मिती करण्यात आली. मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 या तीन अधिनियमांची निर्मिती करण्यात आली. सध्या महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांचा कारभार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नूसार केला जातो.

## * महानगरपालिका निर्मितीचे निकष :-

कोणत्याही नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर करताना खालील बाबींचा विचार होतो.

1) ज्या शहरांची लोकसंख्या अधिक असते.
2) ज्या नगरपरिषदेचे आर्थिक स्थिती मजबूत असते
3) ज्या नगरपरिषदेचे उत्पन्न एक कोटी रूपयापेक्षा जास्त असते.

4) महानगरपालिकेमध्ये वाढीव कर भरण्याची क्षमता स्थानिक जनतेची असावी.
5) स्थानिक जनमत नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर करण्यास संमती देते का?

याशिवाय ज्या शहरांची लोकसंख्या 30000 पेक्षा जास्त आहे. अशा शहराचे महानगरपालिकेत रू[illegible] करण्याचा अधिकार शासनास असतो.

* रचना :-

महानगरपालिकेची रचना खालील चार भागा[illegible] समजून घेता येते.

1) महानगरपालिकेची परिषद
2) महानगरपालिकेचे पदाधिकारी
3) आयुक्त
4) महानगरपालिकेच्या समित्या

1) महानगरपालिकेत लोकांनी निवडून दिलेले स्विकृत प्र[illegible] धी व महानगरपालिकेची पदाधिकारी या सर्वांची मिळ[illegible] महानगर पालिकेची परिषद तयार होते.

300000 ते 600000 लोकसंख्या असणा[illegible] महानगरपालिकेत 65 ते 85 सदस्य असतात.

600000 ते 1200000 लोकसंख्या असणा[illegible] महानगरपालिकेत 95 ते 115 सदस्य असतात.

1200000 ते 2400000 लोकसंख्या असण[illegible] महानगरपालिकेसाठी 115 ते 145 सदस्य असतात.

24000000 पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेसाठी 145 ते 221 सदस्य असतात.

* लोक प्रतिनिधींची निवड :-
महानगरपालिकेतील सभासदांची निवड प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने केली जाते.

* पात्रता :- महानगरपालिकेच्या सभासद होण्याची इच्छा असलेल्या व्यक्तिला खालील पात्रता पूर्ण करावे लागेल.

1) भारताचा नागरिक असावा.
2) वयाची २१ वर्ष पूर्ण केलेली असावी.
3) महानगरातील कोणत्याही एक वार्डाच्या मतदार यादीत मतदार म्हणून त्याचे नाव असावे.
4) तो महानगरपालिकेचा थकबाकीदार नसावा.
5) तो शासकीय लाभाच्या पदावर विराजमान नसावा.
6) तो वेडा किंवा दिवाळखोर नसावा.

* स्विकृत सदस्य :-
महानगराच्या विविध कार्यात उल्लेखनिय काम केलेले समाजसेवा आरोग्य सेवा. महानगरपालिकेचा प्रशासक अनुभव यांचा स्विकृत सदस्य म्हणून निवड केली जाते. या स्विकृत सदस्यांना महानगरपालिकेच्या बैठकांना उपस्थित राहता येते. परंतु मतदान करता येत नाही.

* कार्यकाळ :-
महानगरपालिकेचा कार्यकाळ व महानगरपालिकेच्या सभासदांचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो.

* बडतर्फी :-
राज्यशासन महानगरपालिकेचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी

महानगरपालिका बरखास्त करू शकतो. परंतु अशा बरखास्त महापालिकांची 6 महिन्यांच्या आत निवडणूक घ्यावी लागते. तसेच महानगरपालिकेच्या सभासद स्वखुशीने आपला राजीनामा आयुक्ताकडे देऊ शकतो. एखादा सभासद बेजबाबदार असेल, गैरवर्तनी असेल कर्तव्यात कसूर करणारा असेल अशा सभासदास 3/4 सभासदांच्या मंजुरीने बडतर्फ केले जाते.

* महानगरपालिकेचे पदाधिकारी :

प्रत्येक महानगरपालिकेत निवडून आलेल्या सभासदातून एकाची महापौर व एकाची उपमहापौर म्हणून महानगरपालिकेच्या पहिल्याच बैठकीतून निवड होते. महापौरासाठी आरक्षणाची तरतूद असते. याशिवाय महानगरपालिकेत सभागृहाचा नेता व विरोधी पक्षाचा नेता असतो. या दोन्ही नेत्यांना मान्यता महापौर देतात.

* आरक्षण :

महानगरपालिका 74 व्या घटना दुरुस्तीनुसार आरक्षणाने बांधलेली आहे. ज्यात 50% आरक्षण महिलांसाठी असते. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी ही नियोजीत प्रमाणात आरक्षणाची तरतूद आहे.

* आयुक्त :

महानगरपालिकेत राज्यशासनाचा प्रतिनिधी म्हणून IAS दर्जाचा (केंद्रीय लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण झालेला) एक अधिकारी महानगरपालिकेत नेमला जातो. या प्रतिनिधीला आयुक्त म्हणतात.

## * समित्या :-

कोणत्याही महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र लोकसंख्या, सभासद संख्या, जनतेचे प्रश्न व शहराच्या विकासाचे नियोजन अधिक असते. या अधिकच्या कार्याला सुरक्षितपणे पार पाडता यावे म्हणून खालील समित्यांच्या माध्यमातून कार्य विभाजन केले जाते.

1) स्थायी समिती
2) प्रभाग समिती
3) परिवहन समिती.
4) विशेष व तदर्थ समिती या सर्व समित्यांपैकी स्थायी समिती महत्वाची असते.

## * महानगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने :-

कोणत्याही महानगरपालिकेला आपले कार्य करण्यासाठी व आपल्या समोरील आव्हाने पेलण्यासाठी पैशाची गरज असते. महानगरपालिकेची ही गरज खालील मार्गातून पूर्ण होते.

1) कर आकारणीतून मिळणारे उत्पन्न.
2) करा व्यतीरिक्त मिळणारे उत्पन्न.
3) राज्यशासनाचे अनुदान.
4) कर्ज म्हणून मिळणारा पैसा.
5) राज्यशासनाकडून दिला जाणारा करातील वाटा.
6) विविध दंडामधून मिळालेला पैसा.
7) नुकसान भरपाई मधून मिळणारा पैसा.
8) अनुदान व देणगी रुपाने मिळणारा पैसा.
9) व्याज व नफा यातून मिळणारा पैसा.

* महानगरपालिकेची कार्य :-

महाराष्ट्रातील कोणत्याही महानगरपालिकेला काही कार्य करावी लागतात महानगरपालिकेच्या या कार्याचे दोन भागात केली जाते.

1) आवश्यक कार्य / अनिवार्य कार्य
2) ऐच्छीक कार्य

1) अनिवार्य कार्य :-

नगर ~~[illegible]~~ परिषदेला शहराच्या विकासासाठी व नागरिकांच्या सोयीसाठी काही महत्वाचे कार्य करावे लागतात. महानगरपालिकेच्या या अनिवार्य कार्याचे प्रचिती नगर या शब्दाच्या विग्रहातून येते म्हणजेच

न = नळ, ग = गटार, र = रस्ते. याशिवाय महानगरपालिकेला खालील अनिवार्य कार्य करावे लागते.

1) रस्त्याची स्वच्छता व दिवाबत्तीची सोय करणे.
2) अग्निशमन दलाची व्यवस्था ठेवणे.
3) बांधकाम परवाने देणे.
4) अनिधीकृत बांधकाम रोखणे.
5) स्मशानभूमीची व्यवस्था करणे.
6) जन्म मृत्यूची नोंद ठेवणे.
7) मालमत्तांना क्रमांक देणे.
8) रोग प्रतिबंधक लसीकरण करणे.
9) प्राथमिक शिक्षणासाठी शाळा उघडणे.
10) कर लावणे व वसूल करणे.
11) राज्यशासनाच्या सुचनाचे पालन करणे.
12) शहरातील कचऱ्याची योग्य ~~विल्हेवाट लावणे~~. विल्हेवाट [illegible]
13) जिल्हा अधिकाऱ्याच्या आदेशाने शहराची सिमा निश्चित करणे.

इत्यादी आवश्यक कार्य ...
लागतात.

2) ऐच्छीक कार्य :- ऐच्छीक कार्य महानगरपालिकेवर बंधनकारक नसतात. परंतु शहराच्या सौंदर्यासाठी ऐच्छीक कार्य करते. ज्या महानगरपालिकेकडे पैशाची अधिक उपलब्धता आहे. इच्छाशक्ती आहे. त्या महानगरपालिका ऐच्छीक कार्य करतात. ऐच्छीक का... म्हणजे इच्छेवर अवलंबून असणारे कार्य. यातील कार्याचा समावेश महानगरपालिकेच्या ऐच्छीक कार्यामध्ये होतो.

1) आवश्यक रस्त्यांची निर्मिती करणे.
2) गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करणे.
3) शहरात उदयाने व मनोरंजनाच्या साधनाची निर्मिती कर...
4) सांस्कृतिक सभागृहाची निर्मिती करणे.
5) शहरातील मोकाट जनावरांसाठी कोंडवाडे बांधणे.
6) शहरातील बस वाहतूक सेवा निर्माण करणे.
7) नागरिकांना चांगल्या कामासाठी प्रोत्साहन पर बक्षिस दे...
8) महानगरपालिकेच्या क्षेत्रात यात्रा, प्रदर्शन व समारंभा... आयोजन करणे.
9) शहरातील मांस विक्रेत्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करणे.

याशिवाय महाराष्ट्रातील नगर परिषदांना शैक्षणि... प्रशासकीय, आर्थिक, नैसर्गिक कार्य करावे लागतात. महा... पालिका आपले सर्व कार्य मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, नगरसे... महानगरपालिकेचे कर्मचारी व जनता या सर्वांच्या सहका...

* ७४ वी घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये :-

शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचा विकास व्हावा त्यांना अधिक स्वायत्तता व बळकटी मिळावी म्हणून यांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून दयावा या हेतूने ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या ७४ व्या घटना दुरुस्तीने भारतीय राज्यघटनेत भाग ९ अ समाविष्ट करण्यात आला. या घटना दुरुस्तीनूसार कलम २४३ मध्ये अनेक उपकलमांचा समावेश करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था संबंधी तरतूद करण्यात आली. या सर्व तरतूदींचा समावेश ७४ व्या घटना दुरुस्तीच्या वैशिष्ट्यांमध्ये केला जातो.

१) विविध संकल्पनांना अर्थ सांगणे :-

या घटना दुरुस्तीनूसार निर्माण झालेल्या नगरपालिका व महानगरपालिका संदर्भातील विविध संकल्पनांचा अर्थ कलम २४३ (त) मध्ये स्पष्ट करण्यात आला.

२) नगरपालिकांचे गठन करणे :-

या घटना दुरुस्तीनूसार प्रत्येक घटक राज्यात नगर पंचायत, नगरपालिका व महानगरपालिका या तीन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना करण्यात येईल हे निश्चित झाले.

३) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना :-

राज्य घटनेतील कलम २४३ ~~(ड)~~ (द) नूसार शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचनेसंबंधिची मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले.

४) प्रभाग किंवा समित्या :-

या घटना दुरुस्तीनूसार ३००००० किंवा त्यापेक्षा अधिक

लोकसंख्या असलेल्या नगरपालिका क्षेत्रात एक किंवा अधिक प्रभागासाठी समित्यांची स्थापना करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली.

5) आरक्षण :-
या घटना दुरुस्तीने अनुसुचित जाती व जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येनूसार आरक्षण घोषित केले. महिलांसाठी 1/3 जागा राखीव असतील अशी घोषणा केली इतर मागास प्रवर्गासाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली तसेच नगरपालिकेच्या अध्यक्ष पदाचे आरक्षण घोषित करण्याचा अधिकार राज्यशासनाला दिला.

6) कार्यकाळ :-
या घटना दुरुस्तीने नगरपालिकेंचा कार्यकाळ पाच वर्षाचा असेल अशी तरतूद केली.

7) वित्त आयोगाची स्थापना :-
या घटना दुरुस्तीनूसार स्थापन करण्यात आलेले वित्त आयोग शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचे निरीक्षण करेल नियंत्रण ठेवेल आणि योग्य उपाय योजना व शिफारशी सुचवेल.

8) निवडणुका :-
या घटना दुरुस्तीनूसार राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. या घटना दुरुस्तीने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका घेण्याचे कार्य राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविले.

9) लेखा परिक्षण :-
या घटना दुरुस्तीनुसार शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना विकास कामासाठी मिळालेल्या निधीचे जंमा पत्रक तपासण्याचा अधिकार राज्यशासनाला आहे.

10) अधिकार व कार्य :-
राज्याचे कायदेमंडळ वेळोवेळी कायदे करुन शहरी स्वराज्य संस्थांना कार्य करण्यासाठी अधिकार देईल अशी तरतूद करण्यात आली. तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्था अधिकार व कार्य स्पष्ट करणारे 12 वे परिशिष्ट समाविष्ट करण्यात आला. या परिशिष्ठानूसारच शहरी स्थानिक स्व संस्था आपले अधिकार व कार्य पार पाडतात.

# 3. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष

* **महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये:-**

महाराष्ट्रात केंद्राप्रमाणेच बहुपक्ष पद्धती आहे. प्रत्येक लोकशाही शासनात राजकीय पक्षांचे विशेष महत्व असते. राजकीय पक्ष लोकशाहीची चाके असतात सत्ताधारी व विरोधी पक्ष आपल्या विचार सरणीवर कार्यक्र माद्वारे जनहिताची प्राप्ती करत असतात.

भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात राजकीय पक्षांची महत्वाची भुमिका असते. वर्तमानातील महाराष्ट्रातील आघाडी राजकारणामुळे राजकीय पक्षांना सुवर्णयुग प्राप्त झाले आहे. राजकीय पक्षाची डॉ. लिकॉक यांनी खालील प्रमाणे व्याख्या केली. राजकीय पक्ष म्हणजे राजकीय घटक या दृष्टीने काम करणारा आणि कमी अधिक प्रमाणात संघटित असलेला नागरिकांचा समुह होय.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक राजकीय पक्ष कार्यरत आहेत. महाराष्ट्रात निर्माण झालेले बहुतांश राजकीय पक्ष, कॉंग्रेस पक्षाशी असलेली व्हॅलेनटाईनची भुमिका नाकारु न स्वतंत्र पक्षाची निर्मितीची भुमिका स्विकारली आहे. वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकीय पक्षाबाबत विचार करतात. खालील वैशिष्ट्ये दिसून येतात.

**1) बहुपक्ष पद्धती:-**

भारताच्या अनेक घटक राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही अनेक राजकीय पक्ष आहेत. या सर्व राजकीय पक्षांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला प्रभावित केले आहे. परंतु या अनेक पक्षापैकी जनतेची पसंती काही प्रमुख पक्षांनाच मिळते. महाराष्ट्रात अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष, भारतीय बहुजन महासंघ, शिवसेना, महारा-

पक्ष, नवनिर्माण सेना, जनसुराज्य पार्टी, बहुजन समाज पार्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पार्टी, भारतीय साम्यवादी पक्ष, मार्क्सवादी साम्यवादी पक्ष, या अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत.

२) काँग्रेसचा प्रभाव आणि पडझड :-

१ मे १९६० पासूनच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करता असे स्पष्टपणे जाणवते की महाराष्ट्राच्या राजकारण व शासनावर काँग्रेस पक्षाचा अधिक प्रभाव आहे. कारण महाराष्ट्रातील आजपर्यंतच्या एकूण 58 वर्षांपैकी ४६ वर्ष काँग्रेसची सत्ता राहीली आहे. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, शिवाजीराव पाटील, निलंगेकर, विलासराव देशमुख, सुशील कुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, असे अनेक काँग्रेसचे मुख्यमंत्री झाले आहेत. परंतु १९९५ पासून महाराष्ट्रात काँग्रेसच्या प्रभावाला ग्रहण लागले आहे. एकसंघ असलेली काँग्रेस अनेक गट आणि तटामध्ये विभागली आहे. एकसंघ नेतृत्वाचा अभाव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना, नेतृत्वाची वाढती स्पर्धा इत्यादीमुळे काँग्रेस कमकुवत होत आहे. यामुळेच काँग्रेसला १९९५ आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सत्तेपासून दूर राहावे लागले. तर दुसऱ्या बाजूने शिवसेना व भारतीय जनता पक्षाचा वाढता प्रभाव धर्मनिरपेक्ष राजकारणावर हिंदुत्ववादी राजकरणाची होणारी सरशी काँग्रेसच्या पडझडीस कारणीभूत आहे.

३) व्यक्तीमत्वाने प्रभावित राजकीय पक्ष :-

महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची स्थापना व विकास विशिष्ट विचारसरणी व कार्यक्रमाच्या आधारे

झालेली नाही. परंतु या राजकीय पक्षावर स्थापनेपासूनच विशिष्ट व्यक्तीमत्वांचा प्रभाव दिसून येतो.
उदा :- काँग्रेस - यशवंतराव चव्हाण
शिवसेना - बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरद पवार (सुप्रिया सुळे, अजित पवार)
महाराष्ट्र नवनिर्माण सेना - राज ठाकरे
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया - रामदास आठवले, जोगेंद्र कव्हाडे, खोबरागडे, गव्हई इत्यादी
जनसुराज्य पार्टी - विनय कोरे इत्यादी

4) प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव :-
वर्तमान महाराष्ट्राचे राजकारण संकुचित कार्यक्रम भावना इत्यादीवर आधारीत आहे. व्यापक राष्ट्रहिताची भुमिका घेऊन राजकीय पक्षाची स्थापना होत नाही. प्रादेशिकवाद, प्रादेशिक अस्मितता, धर्म, भाषा, जात इत्यादी विषयावर राजकारण केले जाते. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर शिवसेना, राष्ट्रीय समाज पार्टी, जणसुराज्य पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यासारख्या प्रादेशिक व स्थानिक राजकीय पक्षांचा प्रभाव वाढत आहे. या पक्षांच्या प्रभावामुळे महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय संस्कृती यांच्यात बदल झाला आहे.

5) सर्वसमावेशतेचा आभाव :-
महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकीय पक्षात सर्वसमावेशकतेचा आभाव आहे. सर्वच राजकीय पक्ष विशिष्ट लोकसमुह किंवा विशिष्ट हितसंबंधावर अधिक लक्ष देऊन

राजकारण करत आहेत. सत्ता प्राप्तीसाठी विशिष्ट समुदायां ना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो जात, धर्म व भू-प्रदेशाच्या मर्यादित राजकीय पक्ष झालेले आहेत. महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांची स्थिती प्रदेशापुरतीच मर्यादित राहिली आहे. केंद्रीय स्तरावरील पक्ष ही प्रादेशिक पक्षांच्या भुमिकांचा विचार करुन काम करतात. म्हणून महाराष्ट्रात सर्वसमावेशक राजकीय पक्ष दिसत नाही.

c) सत्ता केंद्री राजकीय पक्ष :-

सत्तेची प्राप्ती करणे हे प्रत्येक राजकीय पक्षाचे अंतिम ध्येय असते. या विधानात जरी सत्यता असली तरी राजकीय पक्षांचे वर्तन, धोरण व कार्यक्रम पुर्णतः सत्ता प्राप्तीच्या दिशेने झुकत आहे. सत्तेसाठी वाटेल ते, निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही अशी भुमिका राजकीय पक्ष घेतात. खोटी आश्वासने देणे, अव्यवहार्य आश्वासने देणे, संधी साधू राजकारण करणे गुन्हेगारीचा आधार घेणे, अमर्याद पैशाचा वापर करणे इत्यादी बाबी राजकीय पक्षाची सत्ताकेंद्री भुमिका स्पष्ट करतात. सत्ता प्राप्ती नंतर सर्व आश्वासनांचा विसर पडणे. सर्वच राजकीय पक्षांचे लक्षण बनले आहे.

d) पक्षा अंतर्गत मतभेद :-

सध्या महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षात अंतर्गत मतभेद आहेत.

उदा :- अशोकराव चव्हाण व नारायण राणे

भारतीय जनता पक्ष - देवेंद्र फडणवीस - एकनाथ खडसे, एकनाथ खडसे - चंद्रकांत पाटील.

देवेंद्र फडणवीस - चंद्रकांत पाटील असाच वाद शिवसेनेमध्ये उद्धव ठाकरे आणि मनोहर जोशी यांच्यात आहे तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये शरद पवार आणि अजित पवार यांच्यात वाद दिसून येतो. यातील बरेच मतभेद व्यक्ती परत्वे आहेत तसेच ते नेतृत्वासाठीचेही आहेत.

8) आघाड्यांचे समर्थन :-

महाराष्ट्रातील राजकीय पक्ष विविध आघाड्यांमध्ये विभागलेले आहेत. साधारणपणे निवडणूकीच्या अगोदर निवडणूकीनंतर आणि विशिष्ट वैचारिक कार्यक्रमाला मान्यता देण्याच्या अटीवर आघाड्या केल्या जातात. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची आघाडी समविचारी पक्षांमध्ये अधिक होते. निवडणूकांमध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळ प्रत्येक पक्षातील संघटनात्मक बांधणीचा अभाव निवडणूका वाढता खर्च राजकीय पक्षांची वाढती संख्या या विविध कारणामुळे आघाडी करावी लागते. महाराष्ट्रात शिवसेना, BJP राष्ट्रीय समाज पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रामदास आठवले गट) आणि अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यांची आघाडी असते.

9) संघटनात्मक बांधणीचा अभाव :-

महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षात काही प्र णात संघटनात्मक बांधणीचा अभाव दिसून येतो. संघटना बांधणी करण्यात अपयश येत असल्यामुळेच कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही. पक्षांतर्गत मतभेद प यी नेतृत्वाचा उदय यामुळे संघटनात्मक बांधणी करणे शक्य नाही.

वरील प्रमाणे महाराष्ट्राच्या राजकीय पक्षाचे अनेक वैशिष्ट्ये सांगता येतात. महाराष्ट्रातील राजकीय पक्षात वरील लक्षणांचा सहभाग असल्यामुळे महाराष्ट्राचा राजकीय संस्कृती, राजकीय विकास व राजकीय आधुनिकीकरणावर परिणाम होत आहे.

* राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :-

– महाराष्ट्रात अनेक राजकीय पक्ष आहेत महाराष्ट्राच्या राजकीय अवस्था राजकारण, राजकीय संस्कृती यांना दिशा देण्याचे काम सर्वच राजकीय पक्ष करतात. या राजकीय पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात हा एक महत्वाचा पक्ष आहे.

सोनिया गांधीच्या नेतृत्वाला विरोध करुन या पक्षाने भारताच्या राजकारणात एका नविन विषयाचा प्रारंभ केला. तो विषय म्हणजे भारतातील सर्वोच्च पदावर भारतात जन्मलेलीच स्वदेशी वंशाची व्यक्ती विराजमान व्हावी या विचाराचे समर्थन करुन शरद पवार पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर या तिघांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडण्याची भुमिका घेतली. भारताच्या राजकारणात स्वतंत्र अस्तित्व असलेल्या या तीन नेत्यांनी 10 जून 1999 ला स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन केला त्या पक्षाचे नाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष होय.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या राजकीय पक्षात शरद पवार प्रमुख नेते आहेत. केंद्रातील आपल्या नेतृत्वाला विरोध होत आहे, संधी मिळत नाही. हा विचार करुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.

* पक्ष स्थापनेची पार्श्वभूमी :-

1991 नंतर भारताच्या राजकारणात एकपक्षीय वर्चस्वाचा अंत झाला. (अपवाद 2014 ची लोकसभा निवडणूक) राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सक्रीय राजकारणापासून सोनिया गांधींनी स्वतःला अलिप्त ठेवले होते. अशा परिस्थितीत काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष पदाची धुरा गांधी घराण्याशिवाय इतर व्यक्तीकडे गेली. उदा:- सिताराम केसरी यामुळे काँग्रेसमधील गटबाजी मतभेद, नेतृत्वाचा अभाव याचा परिणाम सत्तेची समीकरणे साधण्यावर झाला म्हणून सोनिया गांधींनी स्वतः सक्रीय होऊन काँग्रेस पक्षाची सुत्रे स्वतःकडे घेतली. काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष पद सोनिया गांधीकडे देण्यास शरद पवारांचा विरोध होता. या विरोधाची चर्चा सबंध देशभर होऊ लागली. शरद पवारांची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आणि सोनिया गांधींनी स्विकारलेले नेतृत्व व सोनिया गांधींचा विरोध अशा अनेक कारणामुळे शरद पवारांना काँग्रेस सोडावी लागले. काँग्रेस पक्षाला विरोध करून त्यातील एकगट स्वतः सोबत घेऊन शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - जन्म, विस्तार, राजकीय वाटचाल, राजकीय यश, महाराष्ट्राच्या भूमी पुरतेच मर्यादित राहीले.

- स्थापना वर्ष :- 10 जून 1999 ला मुंबई येथे झालेल्या अधिवेशनात या पक्षाची स्थापना झाली.
- अध्यक्ष :- 10 जून 1999 पासून आजपर्यंत शरद पवार या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. सध्या महाराष्ट्रात सुनिल तटकरे हे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आहेत. तर धनंजय मुंडे विधान परिषदेत विरोधी पक्ष नेते आहेत.

- निवडणूक चिन्ह :- प्रारंभापासूनच या राजकीय पक्षा घड्याळ हे निवडणूक चिन्ह आहे.
- राजकीय वाटचाल :- या पक्षाच्या स्थापनेपासून 1999, 2004, 2009 आणि 2014 अशा चार वेळा लोकसभा व विधानसभेच्या निवडणूका झाल्या आहेत. वरील निवडणूकांमध्ये या पक्षाला खालील प्रमाणे लोकांनी पसंती दिली आहे.

| वर्ष | लोकसभा | विधानसभा |
| --- | --- | --- |
| 1999 | 08 | 58 |
| 2004 | 09 | 71 |
| 2009 | 09 | 62 |
| 2014 | 04 | 44 |

राजकीय पदे महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काँग्रेस पक्षासोबत युती करून सत्तेत सहभाग नोंदवला आहे. या पक्षाचे महाराष्ट्रात आत्तापर्यंत अजित पवार हे उपमुख्यमंत्री राहीले आहेत. आर. आर. पाटील हे गृहमंत्री होते. या पक्षाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद मिळवता आले नाही. केंद्रात मात्र सलग 10 वर्ष शरद पवार कृषीमंत्री होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्था सहकार क्षेत्र यावर आपले प्रभुत्व सिद्ध केले आहे परंतु 2014 नंतर महाराष्ट्रा झालेल्या लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत या पक्षाची पिछेहाट होत आहे.

* विचारसरणी / जाहीरनामा / वैचारिक कार्यक्रम / ध्येय धोरणे :

स्थापनेपासून आजपर्यंत या पक्षाने महाराष्ट्र आणि देशात आतील ध्येय धोरणांना प्रमाण मानून आपली भुमिका बजावली आहे भारताच्या सर्वोच्च पदावर भारतीय वंशाचीच व्यक्ती विराजमान व्हावी ही प्रमुख भुमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आहे. या भुमिके शिवाय इतर सर्व मुद्दयांबाबत काँग्रेस पक्षा विषयी बरीच साम्यता आहे. कारण या पक्षातील बरेच नेते काँग्रेस संस्कृतीत वाढलेले राहीलेले आहेत.

1) भारतात जन्मलेली व्यक्तीच देशातील सर्वोच्च पदावर विराजमान व्हावी.
2) वरील विषयानूसार नागरीकत्वाच्या कायद्यात बदल करावा.
3) कृषी विकासाला प्राधान्य देणारे कृषी धोरण तयार करावे.
4) देशाची उत्पादन क्षमता वाढवावी.
5) रोजगार निर्मितीला प्रोत्साहन द्यावे.
6) असंघटित कामगारांना संरक्षण द्यावे.
7) अल्पसंख्यांकांच्या हितासाठी स्वतंत्र मंत्रालय व आयोग स्थापन करुन त्यास संवै संवैधानिक दर्जा द्यावा.
8) महिलांच्या विकास व प्रगतीसाठी विशेष धोरण आखावेत.
9) सार्वत्रिक आरोग्याचे धोरण आखून महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे.
10) समाजातील वंचित व मागासलेल्या घटकांना राजकीय सत्तेत सहभाग द्यावा.

११) रेल्वे सुरक्षा आयोगाची स्थापना करावी.
१२) बौध्दीक संपदा आणि जैविक तंत्रज्ञानाच्या सुरक्षितीसाठी कायदे करावीत.
१३) मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करावा.
१४) कारपोरेट कंपन्यांसाठी आचार संहिता निर्माण करावी या आचार संहितेचे पालन करण्यासाठी एका आयोगाची स्थापना केली करावी.
१५) देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक माहिती मिळविण्यासाठी स्वतंत्र सॅटेलाईटची व्यवस्था करणे.
१६) देशाचे संरक्षण करणाऱ्या जवान व अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र वेतन आयोग नेमणे.

वरील प्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष भुमिका घेऊन केंद्र आणि महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचे राजकीय भवितव्य शोधत असते. या पक्षाला महाराष्ट्रातील जनतेने ग्रामीण व शहरी भागात बऱ्या प्रमाणात पसंती दिली. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात हा पक्ष अधिक मजबूत आहे. या पक्षानेच स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना 50% आरक्षण मिळावे ही भुमिका प्राधान्याने मांडली. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सबलीकरण व्हावे यासाठी सुप्रिया सुळे (पवार) सक्रीय काम करत आहेत.

परंतु २०१४ च्या नरेंद्र मोदीच्या लाटेत ही हा पक्ष टिकाव धरू शकला नाही. महाराष्ट्रातील धर्मनिरपेक्ष परंतू मराठा जातीच्या हिताचे राजकारण करणारा पक्ष अशी ओळख या पक्षाची बनली आहे. जनतेच्या प्रश्नाला तात्काळ सोडवणारी संघटनात्मक बांधणी या पक्षाने केली परंतु महाराष्ट्रातील अधिक भ्रष्टाचारी पक्ष म्हणून सर्वसामान्य जनतेत या